माहितीचा अधिकार

महाराष्ट्र शासन

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर,

नागपूर विभाग, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, मंगळवारी बाजार, नागपूर-४४०००१

दुरध्वनी क्रमांक :- ०७१२-२५६५१४३

E-mail: ronagpur@dtemaharashtra.gov.in Website : www.rdtenagpur.org.in

जावक क्रमांक तंशिस/विकाना/आस्था-१/२०२४/2978 दिनांक 19 SEP 2024

परिपत्रक( महत्वाचे) केवळ ईमेलद्वारे

प्रति,

प्राचार्य,

सर्व शासकीय/अशासकीय अनुदानीत/विनानुदानीत पदवि व पदविका

संस्था, नागपूर विभाग, नागपूर. (तंत्रशिक्षण विभागाच्या अधिनस्त सर्व संस्था)

विषय:- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या तज्ञ सुचीमध्ये नाव समाविष्ठ करण्याबाबत पात्र व्यक्तीकडून केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्याबाबत.

संदर्भ:- १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक ४अ/आस्था/मलोआ/२०२४/३५ दि. ३०.०१.२०२४.

२.मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक ४अ/आस्था/मलोआ/२०२४/ ४९६ दिनांक ११.०९.२०२४

सर्व संस्था प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संकेतस्थळावर तंत्रशिक्षण विभागातील सर्व शैक्षणिक संस्थामधील अध्यापकांना विषय तज्ञ म्हणून अर्ज करण्याबाबत निर्देशीत करण्यास या कार्यालयास संदर्भ क्रमांक १ अन्वये सुचित केलेले असता या कार्यालयाने सदर बाबतीत आयोगाच्या संकेतस्थळावर अधिनस्त अध्यापकांस अर्ज करण्यास सुचित करण्याबाबत ईमेलद्वारे सर्व संस्था प्रमुखांना कळविलेले आहे. तथापी आयोगाच्या पोर्टलवर शैक्षणिक संस्थाकडून कमी अध्यापकांनी अर्ज केला असून अपेक्षीत प्रतिसाद मिळालेला नसल्याचे आयोगाने संचालनालयास कळविलेले असून संचालनालयाने उपरोक्त संदर्भ क्रमांक २ अन्वयेच्या स्मरणपत्राद्वारे या कार्यालयास कळविलेले आहे.

तरी सर्व संस्थाप्रमुखांनी यासोबत संलग्न केलेल्या संचालनालयाच्या संदर्भांकित /लोकसेवा आयोगाच्या / शासन पत्राची प्रत आपल्या अधिनस्त अध्यापकांस अवगत करून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संकेतस्थळावर विषय तज्ञ म्हणून अर्ज करण्यास सुचित करावे. व याबाबतचा एकत्रीत अहवाल दिनांक २५.०९.२०२४ पर्यंत इमेलद्वारे या कार्यालयास सादर करावे.

सहपत्रे- वरील प्रमाणे

( डॉ. सचिन वि. सोलंकी)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

प्रत-

१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई यांना माहितीकरीता सविनय सादर.

२. शैक्षणिक विभाग, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय नागपूर यांना आवश्यक कार्यवाहीकरीता .त्यांनी सदरहु पत्र सर्व अनुदानीत /विनानुदानीत संस्थेस ईमेलद्वारे पाठवावे.